मीरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर
आ. क्र. नर/माअ/१०८६/२०
दिनांक. २१०९१२०२२
सहायक संचालक नगररचना
मि.भा.म.न.पा.

ANNEXURE 'A'

(See rule 3)

Application for obtaining information under the Right to Information Act, 2005

To, PUBLIC INFORMATION OFFICER / DY. ENGINEER (TOWN PLANNING)
M.B.M.C.
KANAKIA, MIRA ROAD

(1) Full Name of the Applicant: RAJESH TALREJA

(2) Address: SECTOR-4 / B-5 / 103, Shantinagar, Mira Road - 401107 (989213 ....)

(3) Particulars of information required:

(i) Subject Matter of Information: महासभा ठराव क्र. ११ दिनांक २/५/१८

(ii) The period to which the information relates: तात्काळ

(iii) Description of Information required:

Please send copy of ठराव क्र. ११ दिनांक २/५/१८ महासभा मध्ये घेतलेला

(iv) Whether information is required by post or in person: POST
(The actual postage charges shall be included in additional fees)

(v) In case by post (Ordinary/Registered or Speed): ANY

(4) Whether the applicant is below poverty line: NO
(If yes, Attached the Photo copy of the proof thereof) ......N.A......

Place: Mira Road

Date: 21/9/22

Signature of Applicant

श्री. पवार
तात्काळ लघु सचिव
नियोजन वर्ग करावा
२१/९/२०२२

10 रु. Rs.10 COURT FEE INDIA भारत दस रुपये TEN RUPEES

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कुलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पूर्व)
ता.जि. ठाणे-401 107, दूरध्वनी :- 022-28121455, * E-mail Id : tp@mbmc.gov.in

RIGHT TO INFORMATION

जा.क्र. मनपा/नर/माहिती अधिकार/ १०९६/२०२२ दिनांक:- ०३/१०/२०२२.
केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. ५८
दिनांक:- ०४/१०/२०२२

M.A. (Legal) 2022-9 V.P.

प्रति
जन माहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबत.

संदर्भ - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत श्री.राजेश तलरेजा यांचे दि. 27/09/2022 रोजीचा अर्ज. जो या कार्यालयास (आ.क्र.नर/माअ/1096) दि.29/09/2022 रोजी प्राप्त.

महोदय,

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत श्री. राजेश तलरेजा यांचा संदर्भीत दि.27/09/2022 रोजीचा अर्ज या विभागास दिनांक-29/09/2022 रोजी प्राप्त झालेला असून सदर अर्जातील माहिती आपल्या विभागाशी संबधित असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, 2005, कलम 6(3) अन्वये संदर्भित अर्ज आपले विभागास वर्ग करण्यात येत आहे. अर्जदारास आपले विभागाशी संबधित माहिती विहीत मुदतीत उपलब्ध करुन घ्यावी.

सोबत - संदर्भिय अर्ज.

(भ. हिं. कुंडले)
**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक नगररचनाकार**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत :-
श्री. राजेश तलरेजा
सेक्टर 4/बी/5-103, शांतीनगर,
मिरारोड (पूर्व) जिल्हा ठाणे - 401107

016

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ५८ /2022 दिनांक :- १० /१० /2022

प्रति,
श्री. राजेश तलरेजा,
सेक्टर - 4/बी-5/103, शांतीनगर,
मिरारोड (पूर्व), 401 107.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
मा. महासभा दि. 02/05/2018, ठराव क्र. 11 ची प्रत मिळणेबाबत.

संदर्भ :- 1) जनमाहिती अधिकारी, नगररचना विभाग यांचेकडील दि. 03/10/2022 रोजीचे पत्र.
2) आपणांकडील दि. 27/09/2022 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्र 1 अन्वये, जनमाहिती अधिकारी, नगररचना विभाग यांनी आपणांकडील संदर्भित पत्र 02 मधील माहिती नगरसचिव विभागाशी संबंधीत असलेबाबत कळवून आपणांस उक्त माहिती परस्पर उपलब्ध करुन देणेसाठी आपणांकडील संदर्भित पत्र 02 ची प्रत या कार्यालयाकडे वर्ग केलेली आहे. आपणांकडील संदर्भित पत्राचे अवलोकन केले असता आपण मा. महासभा दि. 02/05/2018, ठराव क्र. 11 च्या प्रतीची मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने आपणांस मा. महासभा दि. 02/05/2018 (18/04/2018 रोजीची तहकुब सभा), ठराव क्र. 11 ची साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देत आहोत. (एकुण पाने - 2)

उक्त माहितीकरिता लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 02 पानांकरिता रुपये 04/- (अक्षरी रुपये चार मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल करता येईल.

दि. ११/१०/२० २२ रोजी
सदरचे पत्र व ठराव प्रत स्पीड पोस्टद्वारे पाठविण्यात आली.

भारतीय डाक
EM012086264IN IVR:6977012086264
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:1,11/10/2022,10:55
To:RAJESH TALREJA,MIRA RD
PIN:401107, Mira Road S.O
From:MIRA BHAYAN,NAGAR SACHIV VIB
Wt:20gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>
<Dial 18002666868> <Wear Masks, Stay Safe>

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०२/०५/२०१८

## (दि. १८/०४/२०१८ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. 10 :- वेदरशेड करीता भाडे आकारणीबाबत..**

**प्रस्तावना :-** ठराव क्र. ७७

मिरा भाईंदर शहरात विद्यमान इमारतीमधील दुकानांसमोर / हॉटेलसमोरील मोकळ्या जागेवर वेदरशेड उभारण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज प्राप्त होत असतात. त्यानुसार संबधित अर्जदारास मालकांस रु.२,५००/- इतके शुल्क आकारुन तात्पुरत्या स्वरुपात वेदरशेड उभारण्यास ६ महिन्याकरिता परवानगी देण्यांत येत होती. परवानगीतील नमुद वेदरशेड खालील जागा वाणिज्य वापर करता येणार नांही अशा स्वरुपाची अट नमुद केलेली असतानाही खालील जागेचा वापर बहुतांशी ठिकाणी वाणिज्य वापरासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले असता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांचे कलम २२७/१ (ब) अन्वये उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप वैगेरे तात्पुरते उभारणेबाबत तरतुद आहे. तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत विनियम क्र. ५८ इ मध्ये तात्पुरते स्वरुपाची परवानगी देण्याची तरतूद आहे.

महानगरपालिका परिसरातील बहुतांश इमारतीतील तळ मजला किंवा इमारतीवरील मजल्यावर दुकानासमोर पत्राशेड टाकून किंवा हॉटेलच्या आवारात शेड टाकून वाणिज्य वापर करीत असल्याचे व त्यासाठी परवानगी घेतली जात नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे अशा वापरापासून महानगरपालिकेला कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नसल्यामुळे अशा प्रकारे वापर करणा-यांचे वेगळे सर्वेक्षण करुन त्यांना देखील परवानगी दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पनात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून वेदर शेडसाठी परवानगी देतांना वेदरशेड खालील जागेच्या मालकी हक्काचे कागदपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रासह महानगरपालिकेस सार्वजनिक वापरासाठी आवश्यकता वाटेल त्यावेळस स्वखर्चाने जागा मोकळी करुन देणेबाबतचे हमीपत्र संबधित जागामालक / अर्जदार यांचेकडून घेऊन व त्यासाठी १० चौ.मी क्षेत्राच्या मर्यादेत असलेल्या क्षेत्रासाठी रु.२५००/- आकारणी कायम ठेऊन १० चौ.मी च्यावर ५० चौ.मी क्षेत्रापर्यं रु.३००/- प्रति चौ.मी तसेच ५० चौ.मी क्षेत्राच्यावर रु.४००/- प्रति चौ.मी प्रति माह प्रमाणे आकारणी करुन महानगरपालिकेच्या मालकीची जागा वगळून वेदरशेडसाठी मंजुरी देणेबाबत मा.महासभा ठराव क्र.८३ प्रकरण क्र.९० दि.१६/१/२००९ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

तसेच हॉटेल, सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, सार्वजनिक जागा,मोकळ्या जागा, व अन्य व्यावसायिक वापराच्या जागासाठी रु.५/- प्रती चौ.फुट प्रमाणे कर आकारणी करणेबाबत दि.३१/१०/२०११ रोजी मा.महासभेने प्रकरण क्र.६७, ठराव क्र.७१ अन्वये मंजुरी दिलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही कर विभागामार्फत करणेत येत आहे.

वेदरशेडसाठी परवानगी देणेसाठी मा.महासभेने निश्चित केलेले दर जास्तीचे वाटत असल्यामुळे या प्रकारच्या वेदरशेडसाठी महानगरपालिकेची मंजूरी घेण्हाचे प्रमाण फारच कमी झालेले असून त्या अनुषंगीक अनधिकृतपणे वेदरशेडची उभारणी करुन वापर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे वरीलप्रमाणच्या वेदरशेडची उभारणी करुन वापर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे वरीलप्रमाणच्या वेदरशेडसाठी मंजुरी देताना रु.१००/- प्रती चौ.मी प्रती माह साठी दर आकारणी करणेसाठी दि.०८/१२/२०१७ रोजीच्या मा. महासभेसाठी गोषवारा सादर केला असता सदर प्रकरणी मा.महासभेने ठराव क्र. २२ अन्वये खालीलप्रमाणे ठराव मंजूर केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील निवासी वापरातील इमारतींवर तात्पुरत्या वेदरशेडसाठी ४ महिन्याऐवजी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत परवानगी देण्यात यावी व प्रत्येक वर्षी नुतनीकरण करण्यांत यावे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बहुतांश इमारतींवर मोठ्या प्रमाणात टेरेसवर व तळमजल्यावर अनधिकृतपणे वेदरशेड उभारुन वाणिज्य वापर करीत आहे. त्यांना शास्तीसह कर आकारणी करण्यांत यावी. शास्ती लावताना ज्या जागेवर अनधिकृत वेदरशेड उभारले आहे त्यावरच शास्ती लावावी तसेच ज्या मालकांनी

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या
माहितीच्या छायांकीत प्रमाणित प्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

अनधिकृतपणे वेदरशेड उभारले आहे त्याच मालकाच्या सदर इमारतीमधील वास्तुवर सदनिका/गाळ्यांवर शास्ती लावावी त्या इमारतीमधील इतर सदनिका धारकांच्या जागेवर / गाळ्यांवर शास्ती लावू नये.

प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद केलेले हॉटेल व इतर वाणिय व्यवसायिकांबाबतचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे. आयुक्तांनी याबाबत इतर महानगरपालिकांकडून माहिती घेऊन सदर प्रस्ताव फेरसादर करावा.

उपरोक्त ठरावामध्ये नमुद केल्याप्रमाणे हॉटेल व सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालयाच्या लगतच्या लॉन्स किंवा मोकळ्या जागेमध्ये वेदरशेड उभारणेसाठी परवानगी देणेबाबतच्या धोरणासह त्यासाठी आकारणेत येणा-या शुल्का बाबतची माहिती मिळणेसाठी ठाणे, भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली,उल्हासनगर,वसई-विरार, नवी मुंबई महानगरपालिका यांना पत्र देण्यात आलेले आहे. उक्त प्रकरणी ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकेकडे दुरध्वनीव्दारे संपर्क साधला असता इमारतीच्या मोकळ्या जागेत अथवा दुकानासमोर शेड उभारणेस परवानगी देणेबाबत त्यांच्या महानगरपालिकेने धोरण ठरविलेले नसल्याचे सांगण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिहम १९४९ व महानगरपालिकेच्या मंजूर विका नियंत्रण नियमावलीमध्ये हॉटेल, सार्वजनिक हॉल व मंगल कार्यालयालगतच्या मोकळ्या जागेमध्ये वाणिज्य वापरासाठी वेदरशेडसाठी परवानगी देण्याची तरतूद नसल्यामुळे याप्रमाणे मंजूरी देणे उचीत होणार नाही असे प्रशासनाचे मत आहे.

*सबब वरील प्रमाणेच अहवाल मा. महासभेत सादर,*

**ठराव क्र. :-**

रहिवास वापराच्या इमारतीच्या टेरेसवर 3 वर्षाच्या मुदतीकरीता वेदरशेड टाकण्यास परवानगी देण्यात यावी व प्रत्येक 3 वर्षानंतर त्याचे नुतनीकरण करण्यात यावे. नुतनीकरण करणेकरीता मुदतीत अर्ज करणे आवश्यक राहिल. नुतनीकरणासाठी प्रती वर्षाकरिता रु.५००/- इतके शुल्क आकारण्यात यावे. तसेच 3 वर्षानंतर पुन्हा सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करुन वेदरशेडकरीता परवानगी घेणे बंधनकारक राहिल असा मी ठराव मांडत आहे.

*सुचक :-* Dr. Preeti Patil     *अनुमोदक :* हेतल परमार

*ठराव सर्वानुमते मंजुर*
*ठराव वाचून कायम करण्यात आला*

Dmehta
*महापौर*

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या
माहितीच्या ... प्रमाणित प्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका